नागपूर महानगरपालिका,
विविध संवर्गातील वाढीव पदांना मान्यता
देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगरविकास विभाग,
शासन निर्णय-क्रमांक-नामपा-२०१७/प्र.क्र.४१/नवि-२६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दिनांक ०४ मे, २००६
२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र.४४३/आस्थापना, दिनांक ०४/०२/२०१७व पत्र क्र.२५६/आस्थापना, दि०५/०८/२०१७
३) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र.४८९/आस्थापना, दिनांक १२/०१/२०१८
४) आयुक्त, नागपूर मनपा यांचे पत्र क्र.९७/आस्थापना, दिनांक २४/०७/२०१५ व पत्र क्र.२०६८/२०१७ दिनांक ०४/१०/२०१७ आणि पत्र क्र.४०४३/१७ दि.१७/१०/२०१७

प्रस्तावना :-

नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.३७६ दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये, नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या आकृतीबंधास व सेवाप्रवेश नियमांना मान्यता दिल्यानंतर, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०२ येथील दिनांक ०४/०२/२०१७ च्या पत्रान्वये, "नागपूर महानगरपालिका आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम" यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाची मंजुरी प्राप्त होण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला होता.

तद्नंतर, यासंदर्भात महानगरपालिकेचे स्वत:चे आर्थिक उत्पन्न, सध्याचा आस्थापना खर्च आणि नवनिर्मित पदांसाठी होणारा खर्च या बाबींच्या पडताळणीअंती आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी, संदर्भाधीन क्र.०३ येथील पत्रान्वये सुधारित पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे.

तसेच नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "अभियोक्ता" या पदाला "विधी अधिकारी" आणि "सिव्हील कोर्ट एजंट" या पदाला "सहायक विधी अधिकारी" असे पदनाम बदल करण्याच्या अनुषंगाने, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०४ येथील पत्रान्वये प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला होता.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) नुसार मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार या तरतुदीअन्वये शासनास असलेल्या अधिकारातंर्गत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय :-

अ) नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांना यापूर्वी दिलेल्या मंजुरी व्यतिरिक्त, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना उपरोक्त संदर्भाधीन क्र.०३ मधील पत्रान्वये सादर केलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाढीव २०१ पदांना सोबत जोडलेल्या परिशिष्ठानुसार व खालील "ड" मध्ये नमूद अटी व शर्तीवर प्रथम टप्प्यात मंजुरी देण्यात येत आहे.

ब) नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या (१) अभियोक्ता आणि (२) सिव्हील कोर्ट एजंट या पदांचे नाव बदलवून अनुक्रमे (१) विधी अधिकारी आणि (२) सहायक विधी अधिकारी असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

क) यावाढीव पदांना मंजुरी देताना उपरोक्त संदर्भाधीन क्र.०१ मध्ये नमूद ३५% आस्थापना खर्चाची बाब "विशेष बाब" म्हणून शिथील करण्यात येत आहे.

ड) अटी व शर्ती :-

१) नागपूर महानगरपालिकेअंतर्गत प्रशासकिय सेवेतील अधिका-यांची, अतांत्रिक,तान्त्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांची प्रशासकीय पदांवर बदलीने / प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येणार नाही.

२) वाढीव पदे मंजूर करताना, या पदांच्या वेतनश्रेणीत तसेच श्रेणीवेतनात (ग्रेड-पे) सुधारणा प्रस्तावित केलेली नाही याची आयुक्त नागपूर यांनी स्वत: खात्री करावी.

३) महानगरपलिकेच्या ज्या सेवा आऊट सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे, अशा सेवा आऊट सोसिर्गद्वारे करण्यात याव्यात.

४) महानगरपालिकेने स्वत:चे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने आवश्यक तो कालमर्यादित आराखडा १ महिन्यात तयार करुन शासनास सादर करावा व या आराखड्याप्रमाणे महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

५) पुढील आर्थिक वर्षापर्यंत महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५% च्या मर्यादेत येण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सत्वर सुरु करावी.

६) जोपर्यंत महापालिकेचा आस्थापना खर्च विहीत मर्यादेत येत नाही. तोपर्यंत पुढील वाढीव पदांच्या अनुषंगाने कोणताही प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविता येणार नाही.

७) या मंजुरीच्या अनुषंगाने महापालिकेच्या सर्व मंजूर पदांचा संवर्गनिहाय एकत्रीत सेवांचे वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती नियमाबाबतचा एकत्रित प्रस्ताव पुढील ०३ महिन्यात शासनास सादर करावा.

८) सदर वाढीव पदे मंजूर केल्यामुळे, कोणत्याही अनियमित नियुक्त्या नियमित केल्या जाणार नाहीत अथवा पद मंजूरीच्या प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त होण्याच्या

INFORMATION PROVIDED
UNDER (RTI) ACT - 2005



Scanned with OKEN Scanner

अधीन राहून नियुक्त्या केल्या असल्यास, त्यांना या पदांवर सामावून घेता येणार नाही, याबाबत आयुक्त, महानगरपालिका यांनी दक्षता घ्यावी.

९) या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत असलेली पदे, पदभरती संदर्भात जाहिरात देणे / लेखी परीक्षा घेणे इत्यादी व अनुषंगिक मुद्यांबाबत विहीत कार्यपध्दती अवलंबवून तसेच सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार व शासनाकडून वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदभरती करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२११३२५९०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b66280824 5be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2018.02.12 11:37:00 +05'30'

(सं.श.गोखले)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
२) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती (नवि-२६)

INFORMATION PROVIDED
UNDER (RTI) ACT - 2005



Scanned with OKEN Scanner